## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

### परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**परिपत्रक क्र.: परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/----/२०१७**

या परिपत्रकाद्वारे प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण व इतर तत्सम अभ्यासक्रम शिकविणाऱ्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या निर्धारित वेळापत्रकात परीक्षार्थींचे लघुशोध प्रबंध (Dissertation) सादर करण्यासाठी विहित मुदतीचा उल्लेख केलेला नसल्यामुळे उपरोक्त नमूद अभ्यासक्रमांचे परीक्षार्थी व ते अभ्यासक्रम शिकविणारी महाविद्यालये/परिसंस्था लघुशोध प्रबंध (Dissertation) स्विकारण्याची विनंती करत आहेत. ही बाब मा. कुलगुरूंच्या निदर्शनास आणून देण्यात आली व मा. कुलगुरूंनी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत ठेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार लघुशोध प्रबंध (Dissertation) स्विकारण्यासंबंधीचा प्रस्ताव दि. २९-०७-२०१७ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला, प्रस्ताव क्र. ५ च्या अनुषंगाने सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला :

**<u>ठराव</u>**

**आजपर्यंत प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव स्विकारून त्यावर पुढील कार्यवाही करावी. यानंतर प्रत्येक शैक्षणिक वर्षातील परीक्षेनंतर पंधरा दिवसांत लघुशोध प्रबंध (Dissertation) स्विकारावे. त्यानंतर दंड आकारावा असे ठरले.**

सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांना परीक्षा व मूल्यमापन मंडळाने पारित केलेल्या उपरोक्त ठरावाचे अवलोकन व्हावे. तसेच सर्वसंबंधितांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर दि. २१-०७-२०१७ रोजी प्रसिद्ध केलेल्या शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या निर्धारित वेळापत्रकातील लघुशोध प्रबंध (Dissertation) सादर करण्याबाबतच्या महत्वाच्या सूचनेतील सूचना क्र. २८ (क) व (ड) ऐवजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. २९-०७-२०१७ रोजीच्या बैठकीतील उपरोक्त नमूद ठरावानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी राहील. सर्व संबंधित अभ्यासक्रमांची महाविद्यालये/परिसंस्था यांचेसाठी हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

01/8/2017

| | |
|---|---|
| विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद : | **डॉ. राजेश रगडे** |
| **संदर्भ क्र. :** परीक्षा व मूल्यमापन/ समन्वय/२०१७/ 4818 : | संचालक, |
| **दिनांक :** ०१-०८-२०१७. : | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव,**

१) सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांना.

२) विद्यापीठाच्या सर्व संबंधित कक्ष प्रमुख यांना.